पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा. ह प्रभाग विशेष सभा

कार्यपत्रिका क्रमांक – ४

(स भा वृ त्तां त)

दिनांक – १४/०६/२०१८ वेळ. दु.१२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची विशेष सभा गुरुवार दि.१४/०६/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयाचे "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहामध्ये" आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य / नगरसदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य नांव | |
|---|---|---|
| 1 | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| 2 | मा.सुलक्षणा राजू धर | सदस्या |
| 3 | मा.शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| 4 | मा. बनसोडे राजू विश्वनाथ | सदस्य |
| 5 | मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| 6 | मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे | सदस्य |
| 7 | मा.राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| 8 | मा.चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| 9 | मा.संतोष बबन कांबळे | सदस्य |
| 10 | मा.अनिकेत राजेंद्र काटे | स्विकृत सदस्य |
| 11 | मा.संजय गुलाब कणसे | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.संजय घुबे (कार्य. अभियंता स्था), श्री.संजय खाबडे (कार्य. अभियंता वि), श्री.पवार आर.एस. (कार्य.अभि.पापु) श्री.संजय भोसले (कार्य.अभियंता जलनि:सारण), श्री.शिरीष पोरेड्डी (उप.अभियंता स्था), श्री.दिलीप धुमाळ (उप.अभियंता वि), श्री.शशिकांत दवंडे (उप.अभियंता पापु), श्री.पाटील एस.बी. (उपअभियंता पापु), श्री.कोंडे ए. बी. (उप.अभियंता जनि), श्री.एम.आय.खोंद्रे (उप अभियंता झोनिपु),डॉ. शंकर जाधव (उप अधिक्षक ycm), श्री.डी.एस.सासवडकर (सहा. आरोग्याधिकारी), श्री.नरोटे एस.एल.(उप अभियंता स्था उद्यान), श्री.जे.व्ही.पटेल उद्यान निरीक्षक),श्री.शिरसाठ आर.डी. (उद्यान सहाय्यक), श्री.डी.एन.गायकवाड (उद्यान अधिक्षक), श्री.प्रदीप बाराथे (लेखाधिकारी), श्री. अरुण दगडे (पशुवैद्यकिय अधिकारी), श्री.मोरे ए.ए. (क.अ. स्था.उद्यान), श्री. निलेश दाते (क.अ.पापु), श्री.अमर जाधव (क.अ.पापु), श्री.रमेश जिंतीकर (क.अ.जनि),श्रीम. प्रिती यादव, श्री.समीर दळवी (क.अ.वि), श्री.दांगडे सुनिल (क.अ.स्था), श्रीम.जयश्री साळवे (क्रीडा पर्यवेक्षक), श्री.सानप एस.एस. (क.अ.स्था), श्री.महेंद्र देवरे (क.अ.स्था), श्री.भंडारी एस.पी.

(क.अ.स्था), श्री. दिग्विजय पवार (क.अ.पापु), श्री.खरटमोल एम.व्ही.(क.अभि.पापु), श्री.आर.एस.गाडे (अतिक्रमण प्रमुख),श्री.आर.आर.तरंगे (अतिक्रमण प्रमुख), सुनील चौहान (आ.नि), श्री.संजय मानभोडे (आ.नि), श्रीम.रश्मी तुंडलवार (आ.नि), श्री.इंगेवाड एस.एम. (आ.नि), श्री.उध्दव डवरी (आ.नि) इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती – उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

ह प्रभागांतर्गत जलनि:सारण, आरोग्य, पाणीपुरवठा, स्थापत्य या विभागातील कामाची विशेष सभेत चर्चा करणेत आली, त्यानुसार संबंधित पदाधिकारी यांनी पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले.

<u>मा. शाम लांडे</u> - प्रभाग क्र.२० मधील ड्रेनेज लाईन मधील गाळ काढून साफसफाई करणे, त्यासाठी येणा-या गाडया, यंत्रणा ठेकेदार पूर्ण करीत नाही. त्यामुळे वेळेत कामे पूर्ण होत नाही. तरी आपलेमार्फत कामे पूर्ण होण्याची दक्षता घ्यावी. कासारवाडी येथील रेल्वेच्या कडेच्या ड्रेनेजची लाईन बदलणे,किटकनाशक औषध फवारणी व औष्णीक धुरीकरण नियमितपणे केली जात नाही. वैयक्तीक घरगुती शौचालय बांधकामाबाबत, महत्वाचे रस्ते व चौकाची साफ सफाई झाली पाहिजे, झोपडपट्टी भागात साफ सफाईचे काम वेळेवर व लवकर होत नाही. उदा.महात्मा फुले नगर,नाणेकर चाळ

श्री. भोसले (कार्य.अभियंता) जलनि:सारण - यांनी सभेत ४ प्रभागासाठी २ कनिष्ट अभियंता आहेत. त्यामुळे नविन कनिष्ठ अभियंता यांची मागणी प्रशासनाला केली आहे. तसेच मे.बी.व्ही.जी. यांच्याकडे असणारी एजन्सी काढून नवीन ठेकेदारास देणेत येणार आहे. त्यानंतर त्वरीत कामे पूर्ण होतील असे सांगितले. कासारवाडी येथील रेल्वेच्या कडेच्या ड्रेनेजची लाईन ची समक्ष पाहणी करुन पुढील निर्णय घेणेत येईल. व दि. १८/६/२०१८ रोजी सोमवार पर्यंत ड्रेनेज लाईन मधील गाळ काढणेचे काम सुरळीत होईल असे सांगितले.

मा.क्षेत्रीय अधिकारी - यांनी शहरातील वस्त्या, झोपडपट्टी मधील नागरिक उघडयावर शौचास बसणार नाही याकरिता वैयक्तिक घरगुती / सामुदायिक / सार्वजनिक शौचालय त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावे याबाबत सहा.आरोग्याधिकारी व सर्व आरोग्य निरीक्षक यांना तात्काळ कामे करणेबाबत सुचित केले.

<u>मा. माई काटे</u> - ड्रेनेज लाईन मधील गाळ काढणे, वेळोवेळी ड्रेनेज लाईन साफ केली जात नाही. दापोडी परिसरातील ड्रेनेज लाईन सतत चोकप होत असुन त्याची दुर्गंधी सर्वत्र पसरते. प्रभाग क्र. ३० मध्ये उपलब्ध वाहने यांचा पुर्ण क्षमतेने वापर करुन सर्व कचरा कुंड्या दररोज उचलणे. कचरा कुंडीच्या आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवणे. झोनिपू मधील सुलभ शौचालये स्वच्छ करणे, संबंधित ठेकेदारांना वेळोवेळी आवश्यक सुचना देणे. आई उद्यानामधील खेळणी चारीस जातात, तसेच उद्यानामध्ये साहित्य उपलब्ध करुन देणे. नविन खेळणी बसविणे.

श्री. भोसले (कार्य.अभियंता) जलनि:सारण - यांनी नविन ठेकेदारास एजन्सी देण्यात आली आहे. सदरचे कामकाज लवकरात लवकर पुर्ण होईल असे सांगितले.

मा.क्षेत्रीय अधिकारी - यांनी सहा.आरोग्याधिकारी व सर्व आरोग्य निरीक्षक यांना साफ सफाईबाबत सूचना देणेत आलेल्या आहेत.

श्री.खोंद्रे उप. अभियंता - यांनी सार्वजनिक शौचालय सुलभ संस्थेच्या माध्यमातून साफ केले जातात असे सांगितले.

<u>मा. माधवी राजापुरे</u> – प्रभाग क्र. ३१ मध्ये पाणी कमी दाबाने येते, गेले १५ दिवसापासुन नागरिकांच्या सतत तक्रारी होत आहे. दैनंदिन पाणीपुरवठा वेळेत होत नाही, अर्धा तास पाणी येते, अवेळी पाणी येते, त्यामुळे दैनंदिन पाणीपुरवठयाचे नियोजन करावे.

<u>मा.सुलक्षणा धर</u> - ड्रेनेज मधील गाळ काढल्यानंतर ड्रेनेजचा गाळ शेजारीच ठेवला जातो. राडारोडा उचलला जात नाही. ड्रेनेज लाईन व पाण्याची लाईन जवळ असल्यामुळे काही वेळेस पिण्याच्या पाण्याला दुर्गंधी येत असते.

श्री. भोसले (कार्य.अभियंता) जलनि:सारण - ड्रेनेजमधील काढलेला गाळ लवकरच उचलला जाईल व नादुरुस्त असलेल्या चेंबर्सची दुरुस्ती करणेत येईल.

मा.क्षेत्रीय अधिकारी - सर्व विभागाची सभा वेळोवेळी घेवून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना तातडीने काम करणेची सुचना वेळोवेळी दिली जाते.

मा.सभापती - यांनी ह प्रभागांतर्गत जलनि:सारण, आरोग्य, पाणीपुरवठा, स्थापत्य या विभागातील अधिकारी /कर्मचारी यांना नेमून दिलेले कामकाज वेळेत पूर्ण करावे. याकामी विलंब अपेक्षित नाही. काही अडचणी निर्माण झाल्यास संबंधित अधिका-यांनी एकमेकांशी समन्वय साधून काम यथोचितरित्या पार पाडावे.

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

Kamble

(मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत )
सभापती, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षे /१०/ कावि / ११४ / २०१८
दिनांक – २५ / ०६ / २०१८

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर